रावेत पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड
रावेत, पुणे दुरध्वनी क्रमांक ९१३२६२०१००
Email :- ravetpolice2719@gmail.com

प्रसेनोट                                                   दिनांक-२६/०९/२०२४

**रेकॉर्डवरील सोन-साखळी चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास शिताफाने पकडुन, गुन्हे शाखा युनिट -२ यांच्याकडुन पिंपरी चिंचवड आयुक्तालय हद्दीतील दोन गुन्हे उघड**

पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे मा. पोलीस आयुक्त श्री. विनयकुमार चौबे सो., मा.सह-पोलीस आयुक्त श्री. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी सो, पोलीस उप आयुक्त श्रीमती स्वप्ना गोरे मॅडम व सहा. पोलीस आयुक्त मुगूटलाल पाटील सो. यांनी पिंपरी चिंचवड आयुक्तालय हद्दीमध्ये गणेशोत्सवा दरम्यान खुप मिरवणुका असल्याने, सदर गणेशोत्सव मिरवणुका पाहण्यासाठी खुप मोठया प्रमाणात गर्दी होत असते. सदर ठिकाणी महिलांची संख्या मोठया प्रमाणत होत असते. तसेच महिला व मुली हया सोन्याचे दागिने घालुन मिरवणुकी पाहण्यासाठी साठी येत असतात. सदर ठिकाणी गर्दीचा फायदा घेवुन सोन-साखळी चोरी सारखे गुन्हे घडण्याची शक्यता असल्याने, गणेशोत्सव दरम्यान सोन-साखळी चोरी सारखे प्रकार घडु नये. म्हणुन त्याप्रमाणे सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितीन फटांगरे यांनी गणेशोत्सवा दरम्यान असे प्रकार घडु नये. म्हणुन वरीष्ठांच्या सुचनाप्रमाणे हद्दीत पेट्रोलिंग करुन असे प्रकार घडु नये. म्हणुन अधिकारी व पोलीस अंमलदार यांना मार्गदर्शन करुन सुचना दिल्या होत्या.

त्याप्रमाणे दि. १३/९/२०२४ रोजी रावेत पोलीस स्टेशनला हद्दीमध्ये बीट मार्शल कर्तव्य करणारे पो.शि.२४८३/ संदेश शिवराम जाधव व पो.शि.३५६८/ अमित बाळाराम वाघमारे यांना कर्तव्यावर असताना रात्रौ १०.३० वाचे सुमारास नियंत्रण कक्षाने कळविलेल्या माहितीनुसार चिंचवड पोलीस स्टेशन हद्दीमध्ये गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकी दरम्यान एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हिसकावल्याचा प्रकार घडल्याचे समजले. त्यावेळी नियंत्रण कक्षाच्या आदेशानुसार वरील बीट मार्शल हे मुकाई चौक ते लंडनब्रीज कडे जाणाऱ्या बीआरटी रोड वरती पेट्रोलिंग करत असताना, आमच्या विरुद्ध दिशेला बी आर टी रोड मधून एक दुचाकी वर दोन संशयीत इसम वेगाने येत असल्याचे बिट मार्शल यांना दिसले, त्यावेळी बीट मार्शल यांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला असता, ते न थांबता अधिक वेगाने गाडीवरुन पळून जात असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर वरील बीट मार्शल यांनी त्याचा पाठलाग करून त्यांच्या दुचाकी ला स्वतःची दुचाकी अतिशय शिताफिने आडवी लावून त्यांना थांबून त्या दोघांना पकडण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यातील एक इसम हा अंधाराचा फायदा घेऊन पळून गेला .

गाडी चालवणाऱ्या इसमास बीट मार्शल यांनी ताब्यात घेतले सदर इसम हा त्यांना विरोध करत असल्याने, त्यांनी पोलीस स्टेशनच्या इतर पेट्रोलिंग वाहनावरील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना कॉल देऊन मदतीसाठी बोलावून घेतले. वरील नमूद ताब्यात घेतलेल्या इसमास त्याचे नाव पत्ता विचारता उडवा-उडवीची उत्तर देत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर त्यास ताब्यात घेऊन पोलीस स्टेशनला जाऊन अधिक चौकशी केली असता, तो रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याचे समजून आले. व सदर इसमास गुन्हे शाखा युनिट - २ यांच्या ताब्यात दिले असताना, त्याने चिंचवड पोलीस स्टेशन व भोसरी पोलीस स्टेशन हद्दीमध्ये सोन-साखळी चोरीचे गुन्हे केल्याचे कबूल केले व त्याच्याकडून सदर गुन्हयातील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

अशाप्रकारे रावेत पोलीस स्टेशन कडील बीट मार्शल यांनी अतिशय धाडसाने आपले कर्तव्य पार पाडून रेकॉर्डवरील सोन-साखळी चोरी करणाऱ्या गुन्हेगारास पकडले.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त श्री. विनयकुमार चौबे सो., मा.सह-पोलीस आयुक्त श्री. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी सो, पोलीस उप आयुक्त परिमंडळ – १ श्रीमती. स्वप्ना गोरे मॅडम व सहा. पोलीस आयुक्त चिंचवड विभाग श्री. मुगूटलाल पाटील सो व वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन फटांगरे, रावेत पोलीस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली पो.शि.२४८३/ संदेश शिवराम जाधव व पो.शि.३५६८/ अमित बाळाराम वाघमारे यांनी सदरची उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. त्याबाबत दोन्ही पोलीस अंमलदार याचा मा.पोलीस आयुक्त सो. यांनी यथोचित गौरव केला असुन, त्यांना रोख रक्कम २५,०००/- रुपये बक्षीस जाहीर केले आहे.

( स्वप्ना गोरे )
पोलीस उप - आयुक्त
परिमंडळ -१ पिंपरी चिंचवड आयुक्तालय